International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# संत तुकाराम आणि संत कबीर यांचे परिवर्तनवादी विचार

**रोहिदास कुंडलिक खेडकर**

संशोधक, मराठी विभाग,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड- पुणे

**प्रास्ताविक:**

परिवर्तन म्हणजे बदल, स्थित्यंतर होय. मानवाची उत्क्रांती झाली, त्याआधी तो इतर, प्राण्याप्रमाणे जंगलात राहत असे. वन्य प्राण्यांच्या समूहाभोवती राहणारा मानव प्राण्यांचाही समूह होता. काळानुरूप मानव प्राण्यांमध्ये परिवर्तने होत गेली. परिवर्तनाची प्रक्रिया ही नैसर्गिकच होती. परंतु बहुतेक परिवर्तने कालमानाप्रमाणे अत्यंत संथ गतीने झाली. त्यात मानवी विकासाचा समावेश करावा लागेल. मानव हा विचारशील प्राणी आहे. त्याने आपल्या बुद्धीच्या जोरावर आपल्या अस्तित्वाचा शोध स्वतः घेतला. अग्नीच्या शोधापासून ते विमानाच्या शोधापर्यंत त्याने मजल मारली. ही परिवर्तने का झाली? मानवाला परिवर्तनाची गरज का भासली? यांचा शोध माणसानेच सुरू केला.

आपल्या अस्तित्वाचे आत्मचिंतन करण्याबरोबर माणसाने व्यापक विचार केला. या जगातील नैसर्गिक शोधांसोबत वैज्ञानिक शोधाकडे वाटचाल करू लागला. हे केवळ बुद्धीच्या आधारावर शक्य झाले. मानव हा सर्वाधिक मोठा मेंदू असणारा प्राणी आहे. त्यामुळे तो सर्व प्राण्यांमध्ये अधिक प्रगल्भ विचार करू शकतो. या मेंदूच्या जोरावरच त्याने अनेक शोध लावले. विश्वातील अनेक रहस्य उलगडून दाखवली. मात्र निसर्गातील काही गुढे आजही त्याला उलगडता आलेली नाहीत. अशातच केव्हातरी त्याला ईश्वरी शक्तीची जाणीवही झाली असावी. चंद्र, सूर्य, आकाश, पृथ्वी, वायू यासारख्या गोष्टीबद्दल माणसाच्या मनात कुतुहूल निर्माण झाले. अनेक शोध लावणाऱ्या मानवाने ईश्वर, व त्या अनुषंगाने शोध घेतला.

मानव म्हणजे इतर प्राण्यासारखा केवळ एक प्राणी नसून तो त्यापेक्षा अधिक कांही आहे. सर्वसामान्य प्राणी ते विश्वातील प्रमुख जीव ही माणसाची प्रगती आवाक करणारी आहे. माणसाने ज्या पद्धतीने आपला विकास साधला, त्यामुळे त्याला केवळ एक प्राणी संबोधने हा मानवाच्या अस्तिवाला खुजे करणे होईल. त्याने आपल्या मानवी जीवनामध्ये अधिकाधिक प्रगती केलेली दिसते. त्याने या विश्वामध्ये आपले निर्विवाद अढळ स्थान निर्माण केले आहे. मानवी व्यक्तिमत्वाच्या परिवर्तनामध्ये अनेक बाबींचा अंतर्भाव झाला. माणूस हा केवळ माणूस राहिला नाही, तर त्याने आपली स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली.

प्रत्येक काळानुसार मानवामध्ये झालेली परिवर्तने म्हणजे बदलाचीच प्रक्रिया होय. ही प्रक्रिया निरंतरपणे आजही सुरू आहे. मानवाच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख विविध अंगी स्वरूपात झाली. त्याच्या कार्यावरून, कर्तबगारीवरून तो आपली ओळख निर्माण करू लागला. समाजाची सेवा करणारा समाजसुधारक, शोध लावणारा संशोधक, रोग्याची सेवा करणारा वैद्य, विचार करणारा विचारवंत, ईश्वराची भक्ती करणारा तसेच समाजाचे कल्याण चिंतनारा असा संत, विज्ञानाचा शोध लावणारा वैज्ञानिक, यंत्राचा शोध लावणारा यांत्रिक, साहित्याचे सृजन करणारा साहित्यिक, अशा अनेक विविध पैलू असणाऱ्या मानवाची ओळख जगामध्ये निर्माण झाली. ती केवळ परिवर्तनामुळेच. हा बदल 'स्व' पासून ते विश्वात्मक परिवर्तन करण्याची शक्ती यामुळेच शक्य झाले. हेच परिवर्तन हाच बदल संतांनीही आपल्या वाणी आणि करणी यातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून तर संत ज्ञानदेव म्हणतात,

"हे विश्वचि माझे घर ।
ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ।।"[१] (ज्ञा. अ. १२ ओ. २१३)

अनेक जन्माचे पुण्य संपादन करून संत पदापर्यंत पोहोचविण्याची किमया संत प्रवृत्तीच्या माणसात आहे. स्वतःचे कर्म सत्कर्म असावे. संतांनी सत्कर्माकडे वाटचाल केली. समाजाचे कल्याण होवो, ही सद्भावना संतांनी व्यक्त केली. संत ज्ञानदेवांनी तर अवघ्या विश्वाला माझे म्हटले आहे, त्यासंबंधी ते म्हणतात की 'हे विश्व माझे आहे असे म्हणण्याची ज्याची मती म्हणजे बुद्धी आहे. तो व्यक्ती संपूर्ण चराचराचे अस्तित्व झाल्याशिवाय होत नाही' स्वतः ज्ञानदेवांनी म्हटले आहे की, 'हे विश्वच माझे घर आहे, आणि मी या विश्वाचा आहे' की वैश्विक दृष्टी संतांमध्ये होती.

**आंतरिक आणि बाह्य परिवर्तने :**

मानवी मन एक आहे की दोन आहेत ह्याविषयी आजही परस्परविरोधी मत मांडली जातात. माणसाला दोन मने असल्याचे म्हटले जाते. आंतरिक मन, बाह्य म्हणजेच समाजामध्ये आपले वेगळे रूप धारण करणारे मन मानवी मनाची चंचलता ही अस्थिर आहे. याविषयी अनेक संतांनी मनाविषयी आपापली मते व्यक्त केली आहेत. संत रामदासांनी तर 'मनाचे श्लोक' यामधून मनोबोध म्हणजे प्रत्येक मानवी मनाला उपदेशच केला आहे.

"मना वासना दुष्ट कामा न ये रे ।
मना सर्वथा पापबुद्धि नको रे ।।
मना सर्वथा नीती सोडू नको हो ।
मना अंतरी सार वीचार राहो ।।"[२] (मनाचे श्लोक क्र. ४)
किंवा

"मना पापसंकल्प सोडूनि द्यावा ।
मनात सत्य संकल्पी जीवी धरावा ।।
मना कल्पना ते नको वीषयांची ।
विकोर घडे हो जनीं सर्व ची ची ।।"[३] (मनाचे श्लोक क्र. ४)

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

मानवी मनाबद्दल संत रामदास स्वामींनी आपले उपदेश पर वचन व्यक्त केले आहेत. मनामध्ये दुष्ट वासना पापबुद्धि नसावी. मनामध्ये नीती आणि आंतरिक कळवळा, इतरांच्या भल्याची भावना हा विचार उपदेश संत रामदास स्वामी करतात. मनामध्ये वेगवेगळे विकार असतात. त्यामुळे माणसाचे अध:पतन होते. मनामध्ये पाप, विषयांचे चिंतन नसावे, तर मनामध्ये नेहमी सत्याचा विचार असावा. विकारी गोष्टीचा विचार सोडून देण्याचे आवाहन संत रामदास स्वामी मनाला करतात.

**संत तुकारामाचे मन परिवर्तनविषयक विचार :**

संत तुकाराम हे वारकरी संप्रदायाचे कळस ठरले. संत तुकारामांनी आपल्या जगण्याचा उद्देश समाजाला सांगितला नसून तो आपल्या स्वतःच्या मनाला सांगितला आहे.

"तुका म्हणे होय मनाशी संवाद ।
आपुलाचि वाद आपणांशी"[४] ॥ (अ. क्र. २४८१)

मानवी मनाशी संवाद साधून संत तुकारामांनी समाजाशी देखील संवाद साधला. लोकांच्या भल्यासाठी संत तुकारामांनी अहोरात्र संघर्ष केला.

" जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुलें ॥ १ ॥
तो चि साधु ओळखावा । देव तेथे चि जाणावा ॥ २ ॥"[५] (अ. क्र. ३४७ तु. गा.)

किंवा

"जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ।
देह कष्टविती पर उपकारे ॥"[६] (अ. क्र. १५१० तु. गा)

संत तुकारामांचा जीवन जगण्याचा मूळ उद्देश म्हणजे आत्मकल्याणाबरोबर लोककल्याण व्हावे हाच आहे. त्यासाठी लोकचिंतन करावयाचे म्हणजे लोकांचे प्रश्न, व्यथा, अडचणी, समजून घेणे, त्यावर चिंतन करणे; त्याबरोबर या आत्मचिंतनातून लोकसंवाद साधने हाच ध्यास घेतला. म्हणजेच समाज परिवर्तन करण्यासाठी आत्मपरिवर्तन करणे किती आवश्यकता आहे याची वस्तुस्थिती त्यांनी विशद केली. आणि याविषयीचा वस्तूपाठ तुकारामांनी समाजाला घालून दिला आहे.

संत तुकाराम महाराजांनी आपल्या मनाला उपदेश करून 'स्व' परिवर्तन केले. प्रतिकूल परिस्थितीत देखील मनावर विजय मिळवणे, हीच स्थितप्रज्ञ व्यक्तीची लक्षणे आहेत. संत तुकारामांनी देखील आपले मन पांडुरंगाच्या भक्तीमध्ये दृढ केले. ते आपल्या एका अभंगात मनाची अवस्था कशी परिवर्तनीय असते, यासंबंधीचा विचार सांगतात.

"एक मन तुझ्या अवघा भांडवला
वांटितां तें तुला येई कैसे ॥ १ ॥
म्हणूनि दृढ धरीं पांडुरंग ।
देहा लावीं संग प्रारब्धाचा ॥ २ ॥
आणिका संकल्पा नको गोऊं मन
तरीच कारण साध्य होय ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें जाणावें उचिंत ।
तरी सहज स्थित येईल कळों ॥ ४ ॥"[७] (अ. क्र. ८९४ तु. गा.)

आत्मस्वरूपाची सहजस्थिती प्राप्त होण्यासाठी आपली वृत्ती ईश्वराच्या भक्तीत, नामस्मरणात, एकरूप करणे आवश्यक आहे, अनेक वेगवेगळ्या विषयात मन विभागल्यामुळे कोणतेच कार्य सिद्धीस जाणार नाही. यासाठी पांडुरंगाच्या ठिकाणी मन दृढ करण्याविषयी संत तुकाराम सांगतात.

आपली प्रगती किंवा अधोगती मानवी मनावर अवलंबून असते. या चपळ, चंचल मनामुळे जीवनात अधोगती होते. यासाठी आपले मन ईश्वरभक्तीमध्ये ध्यानस्थ करावे.

"गति अधोगति मनाची युक्ति ।
मन लावी एकांती साधुसंगे ॥ १ ॥
जतन करा जतन करा ।
धावतें सैरा ओढाळ तें ॥ २ ॥
मान अपमान मनाचे लक्षण ।
लाविलीया ध्यान ते चि करी ॥ ३ ॥
तुका म्हणे मन उतरि भवसिंधु ।
मन करी बंधु चौऱ्यांशीचा ॥ ४ ॥[८] (अ. क्र. ११२३ तु. गा.)

किंवा

मनाच्या सैराट धावण्याविषयी संत कान्होबा म्हणतात,

"काय काय करितों या मना ।
परी नाइके नारायणा ॥
करू नये त्याची करी विवंचना ।
पतना नेऊं आदरिलें ॥ १ ॥
भलतियां सवे धावे सैराट ।
वाट आडवाट दरे दरकुट ।

न विचारी कुडें कही कपट ।
घात बळकट मांडियेला ॥ २ ॥" [९] (अ. क्र. ६७१ तु. गा.)

संत तुकारामांची धाकटे बंधू कान्होबा यांनी देखील आपल्या चंचल मनाची व्यथा सांगितली आहे. स्वतःच्या मनावर नियंत्रण ठेवता येत नाही. अनेक प्रयत्न करूनही हे मन ऐकत नाही. यासाठी संत तुकारामांचे बंधू कान्होबा देवाला सांगतात की, माझ्या सैराट झालेल्या मनाची अवस्था तू पहा,

"तुकया बंधू म्हणे ऋषिकेशी ।
धांवं मज ऐसी परी जाली ॥ १ ॥ (अभंग क्रमांक ६७१ तुकाराम गाथा)

आपल्या धाकट्या भावाच्या मनाची जी अवस्था झाली, तशीच अवस्था संत तुकारामाच्या मनाची झाली आहे.

"सांगतो या मना ते माझे नाइके ।
घातावरी टेंके चांडाळ हें ॥ १ ॥
म्हणऊनि पाहे बुडतें ।
न लाहे पुरते बळ करू ॥ २ ॥" [१०] (अभंग क्रमांक १८२४ तुकाराम गाथा)

माझ्या मनाला मी सांगतो, परंतु ते माझे ऐकत नाही. दुसऱ्याचा घात करण्यासाठी हे चांडाळ मन टपलेले असते. या संसारातून न बुडता तरुन कसे जावे? हे पाहत असल्याचे संत तुकाराम महाराज सांगतात. संत तुकारामांनी पांडुरंगाला विनवणी केली आहे की, तूच आता माझ्या या न आवरणाऱ्या मनापासून रक्षण कर.

"मज राखे आतां । तुका म्हणे पंढरीनाथा ॥" [११] (अभंग क्रमांक १८३७ तु. गा.)

अशा चपळ मनावर संत तुकाराम यांनी विजय मिळविला. पांडुरंगाच्या ठिकाणी आपले चित्त एकाग्र केले.

"होऊ नको काही या मना आधीन ।
नाइके वचन याचे काही ॥ १ ॥
हटिवाची गोष्टी मोडून टाकावी ।
सोई ही धरावी विठोबाची ॥ २ ॥" [१२] (अ. क्र. २८९५ तु. गा.)

संत तुकाराम महाराज सांगतात की, या मनाच्या आधी न होता; मनाचे काही ना ऐकता, मनाचे सर्व हट्ट मोडून टाकावेत, आणि विठोबाची संगत धरावी. हाच म्हणून निग्रहाचा मार्ग असल्याचे संत तुकारामांनी सांगितले आहे. आपल्या जीवनात यश प्राप्त करायचे असेल तर, मनाची प्रसन्नता महत्त्वाची असावी लागते.

"मन करा रे प्रसन्न ।
सर्व सिद्धीचे कारण ॥
मोक्ष अथवा बंधन ।
सुख समाधान इच्छा ते ॥ १ ॥" [१३] (अ. क्र. २९१)

**२. संत कबीरांचे मनपरिवर्तनविषयक विचार:**

संत कबीरांचा प्रभाव महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत तुकारामांवर पडलेला दिसतो. संत तुकारामांनी संत वाङ्मयाचे चिंतन, अभ्यास केला, त्यामध्ये संत कबीरांच्याही पदांचा उल्लेख आढळतो. संत कबीरांच्या विचारांचा अधिकाधिक प्रभाव पडल्याचे संदर्भ संत तुकारामांच्या अभंगातदेखील आढळतात. संत तुकारामांप्रमाणे संत कबीरांनी देखील आत्मचिंतनाकडे वाटचाल केलेली आहे. अगदी बालपणापासून संत कबीराने आपल्या मनाची परीक्षा घेतलेली आहे. श्यामसुंदरदास संपादित 'कबीर ग्रंथावली'मध्ये 'मन कौ अंग' अशा नावाचे दोह्याचे प्रकरण देण्यात आलेले आहे. 'मन के अंग; यामधून चंचल मनाची व्यथा सांगितलेली आहे. त्याचबरोबर मनावर विजय कसा मिळवावा? याविषयी सांगितले आहे.

मानवी मनासंदर्भात अनेक चांगल्या वाईट बाबींचा विचार केला आहे. मनाची निर्मळता, शुद्धता हीच आपल्याला आनंद देऊ शकते. विषयवासनांनी ग्रस्त झालेल्या, मायेने अंध झालेल्या मनाने, माणसाचे अधःपतन कसे होते? मनामध्ये वेगवेगळे विकार कसे उत्पन्न होतात? केवळ मनावर नियंत्रण नसते, त्यामुळे काम, क्रोध, मोह, माया, आसक्ती इत्यादी विकारांनी मानवी मन आंधळे होते. हे सर्व नष्ट करायचे असेल तर, आपल्या मनाला ईश्वराच्या नामस्मरणामध्ये गुंतवून ठेवणे हाच एक मार्ग असल्याचे सांगितले आहे. मनाची चंचलता माणसाला विनाशाकडे घेऊन जाणारी असल्याचे संत कबीर सांगतात. यासंदर्भात संत कबीरांनी मनाला काबुत म्हणजे नियंत्रणात कसे ठेवावे याविषयीचे विचार आपल्या 'मन के अंग' या प्रकरणांमध्ये सांगितले आहेत. माणसांना मनाच्या इच्छेप्रमाणे वागणे योग्य नसून मन हे विषयवासनांनी पछाडलेले आहे. त्यामुळे विषयासक्त होण्याची सवय सोडून देण्याचे आवाहन संत कबीर अत्यंत तळमळीने करतात.

"मन कै मते न चालिए, छाँडि जीव की बाँणि ।
ताकू केरे सूत ज्यूँ, उलटि अपून आँणि ॥ १ ॥" [१४] (क. ग्र. साखी क्र. ०२)

मानवी जीवनाचे यश- अपयश हे केवळ मनाच्या अवस्थेवर अवलंबून असल्याने प्रत्येक माणसाने मनाच्या एकाग्रतेसंबंधीचा विचार करायला हवा. संत कबीरांचा हा विचार मानवी परिवर्तनाकडे घेऊन जाणारा विचार आहे. कारण मानवी दुःखाचे मूळ 'इच्छा'(तृष्णा) ही आहे. असे गौतम बुद्धांनी देखील सांगितलेले आहे. म्हणून मनाच्या स्वैरइच्छेप्रमाणे न वागण्यासंबंधीचा उपदेश संत कबीर करतात. संत कबीरांनी धाग्याचा दृष्टांत देऊन मनाला कसे नियंत्रित ठेवायचे हे सांगितलेले आहे.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

"ताकू केरे सूत ज्यूँ, उलटि अपून आँणि ‖ १ ‖"

ज्याप्रमाणे सूत कताई यंत्रामधून सूत कातले जाऊन त्याच यंत्राला गुंडाळते. अगदी त्याचप्रमाणे आपल्या मनाला संसारामधून विरक्त करून ईश्वरभक्तीमध्ये मन लावावे असे संत कबीरांनी म्हटले आहे.

**समाजपरिवर्तनात संतांची भूमिका:**

आपल्या आंतरिक परिवर्तनासोबत बाह्य परिवर्तने देखील महत्त्वाचे असते. मुलत: आंतरिक मनातील विकार नष्ट झाल्याशिवाय बाह्य परिवर्तन होणे शक्य नाही. समाजात आज वेगवेगळ्या समस्या पाहायला मिळतात. शिक्षण, बेरोजगारी, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, कर्मकांड, रुढी-परंपरा, त्याची यासारखी मोठी यादी सांगता येते. संत तुकाराम आणि संत कबीर यांच्या काळामध्ये देखील अशा समस्या होत्या. धार्मिक कलह होता. जातीभेद, अंधश्रद्धा, कर्मकांड यासारख्या सामाजिक समस्यांनी समाज ग्रासला होता. समाजात अस्थिर वातावरण तयार झाले होते. हिंदू-मुस्लिम यांच्यातील संघर्ष, वर्णव्यवस्था, कर्मकांड यांची स्तोम माजले होते, अशा परिस्थितीत मध्ययुगीन कालखंडातील या समस्यांचे चिंतन अनेक संतांनी केलेले त्यांच्या साहित्यात पहायला मिळते. संतांनी हा अज्ञानाच्या अंध:कारात बुडालेल्या, अध:पतित झालेल्या समाजाचे प्रश्न समजून घेतले. त्यांच्या प्रति तळमळ व्यक्त केली. स्वतः तुकारामांनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे.

"बुडते हे जन न देखवे डोळा ।
म्हणवूनि कळवळा येतो आहे ‖"

समाज अज्ञान, वा तत्सम कारणांनी व्यथित झालेला पाहून संतांना असह्य झाले. आणि जगाच्या कल्याणासाठी आपण संघर्ष केला पाहिजे, समाजाला त्रासातून बाहेर काढले पाहिजे, त्यासाठी अहोरात्र संघर्ष केला. समाज बदलला पाहिजे, समाजात परिवर्तन होणे गरजेचे आहे, हीच भूमिका संतानी घेतली. समाजात शांतता, सुख, समाधान प्राप्त व्हावे यासाठी संतांनी समाजाला उपदेश केला. त्यांच्यात बदल घडवून आणण्यात सर्व संतांचे कार्ये महत्त्वपूर्ण आहे. या ठिकाणी संत तुकाराम आणि संत कबीर यांनीसुद्धा आपल्या संघर्षमय आयुष्यात समाजाचे हितच जोपासले. ही गोष्ट सार्वकालिक उल्लेखनीय ठरणारी आहे. जगाचे कल्याण व्हावे, यासाठी संत या जगामध्ये येत असतात.

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति ।
देह कष्टविती परोपकारे ‖"

जगाच्या कल्याणासाठी संतांनी आपली काया चंदनासम झिजविली. यामध्ये संत तुकाराम आणि संत कबीरांचे स्थान त्या-त्या काळात महत्त्वाचे आहेच परंतु आजच्या काळातदेखील त्यांचे विचार समाजपरिवर्तनासाठी निर्णायक ठरतात. संत विचारांची गरज आजसुद्धा तितकीच अपरिहार्य आहे. त्याशिवाय सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक परिवर्तन होणे शक्य नाही.

आजच्या वर्तमान काळातदेखील संत कबीरांचे विचार कसे महत्त्वाचे ठरतात, याविषयीचे मत डॉ. श्यामनंदन किशोर यांनी 'कबीर साहित्य और वर्तमान संदर्भ उसकी उपयोगिता' या लेखांमध्ये मांडले आहे. "आज एक काल-खण्ड है और उसकी प्रासंगिकता का अर्थ, कल के कालखण्ड से जुडा रहना है । क्योंकि समय चिरंन्तन प्रवाहमान है प्रवाह मान है और कुछ सामाजिक, धार्मिक समस्याएँ भी ऐसी है, जो काल-खण्डों मे बाँटकर है जो परम्परागत धारण किये हुई है । कबीर के अविर्भाव के पाँच सौ वर्षो सें आधीक के अंतराल के बाद भी ऐसा लगता है कि कबीर की उपादेयता आज भी ज्यों- की- त्यों बनी हुई है । जाती, वर्णभेद, धार्मिक कट्टरता, अहंकार, मोहलिप्सा, अंत: से अधिक बाह्य की चमक-दमक आदि अनेक ऐसी उलझने है, जो ज्यों –की- त्यों बनी हुई है ।" [१५]

एकविसाव्या शतकातदेखील सामाजिक समस्या दिसून येतात. या समस्येवर मात करण्यासाठी संत कबीरांचे विचार किती उपयुक्त ठरतात याविषयीचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. खरोखर समाजाने संत कबीर आणि संत तुकारामांच्या विचारांचा अंगीकार करून सामाजिक ऐक्य निर्माण करणे गरजेचे वाटते. आजच्या काळातील बाह्य आकर्षण, ढोंगीपणा, अनाचार अशा विकृत बाबींचा शिरकाव होतो आहे. यावर नियंत्रण आणावयाचे असेल तर संतविचार हाच एकमेव मार्ग आहे. संतही समाजाचे हित जोपासतात. शांतता, स्थैर्य, प्राप्त व्हावे, लोक सदाचारी व्हावेत, नैतिक हवेत, ईश्वर भक्तीच्या मार्गात आपल्या आयुष्याचे कल्याण करून घ्यावे; अशी नि:स्वार्थ भूमिका संतांनी सांगितलेली आहे.

**समारोप:**

भारतीय भक्ती परंपरेत संत तुकाराम आणि संत कबीर महत्वाचे मानबिंदू ठरले आहेत. विश्वसाहित्यातसुद्धा या संतद्वयाचे स्थान उल्लेखनीय ठरणारे आहे. याला कारणीभूत त्यांचा मानवतावादी विचार असलेला दिसतो. सर्व सामान्य जनतेला अध्यात्मिक भक्तीसोबत दैनंदिन जगण्याला कार्यकारणभाव, विवेक त्यांनी प्रदान केला. म्हणूनच त्यांचे विचार कालबाह्य न ठरता आजही तेवढेच प्रासंगिक ठरतात.

भक्तिने आत्मकल्याण, सन्मार्ग, लोककल्याण साधले जावे, ही परोपकारी तळमळ या संतांच्या साहित्यात दिसते. समाजातील अमंगल नाहीसे होऊन समाजाचा नैतिक स्तर उंचवावा, सर्वांनी निर्मळ भावनेने सहजीवन जगावे, कर्मकांड सोडून देऊन आत्मकल्याण, जनकल्याण साधण्यासाठी प्रयत्न करावेत, असा उद्दात दृष्टिकोन त्यांच्या विचारातून प्रत्ययास येतो. एका ठिकाणी संत तुकाराम म्हणतात,

"उजळवया आलो वाटा ।
खराखोटा निवाडा ‖"

आपल्या हयातभर संत तुकाराम यांनी हा मार्ग अनुसरला. संत कबीराचे जीवन, साहित्य पाहिल्यास त्यातसुद्धा ह्यापेक्षा वेगळा भाव दिसत नाही. उभय संतानी समाजात परिवर्तन घडून मानवाचे अधिकाधिक हित व्हावे, यासाठी परंपरावादी विचारांशी अहोरात्र संघर्ष केला आहे.

**निष्कर्ष:**

१) संत तुकाराम आणि संत कबीर यांच्यामध्ये मानवी मनाचे चिंतन सारखेच असल्याचे दिसून आले.
२) आत्मकल्याणाबरोबर लोककल्याण हीच या दोन संताची भूमिका असल्याचे लक्षात येते.
३) या दोन संताच्या विचारांची प्रासंगिकता स्थलकालनिरपेक्ष आहे.

**संदर्भसूची:**


1. तांदळे, ज्ञानेश्वर(संपा.), 'ज्ञानेश्वरी', अमोल प्रकाशन-पुणे, नवीन आवृत्ती-२०११; पृ. क्र. ३१७.
2. श्रीसमर्थ रामदासस्वामी विरचित, 'सार्थ मनाचे श्लोक', गीताप्रेस-गोरखपूर, पृ. क्र. ०५.
3. तत्रैव, पृ. क्र. ०५.
4. 'श्रीतुकारामबावांच्या अभंगाची गाथा', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ-मुंबई, द्वि. आवृत्ती-१९५५, पृ. क्र. ४२२.
5. तत्रैव; पृ. क्र. ५७.
6. तत्रैव; पृ. क्र. २६१.
7. तत्रैव; पृ. क्र. १६१.
8. तत्रैव; पृ. क्र. २०१.
9. तत्रैव; पृ. क्र. १२९.
10. तत्रैव; पृ. क्र. ३१७.
11. तत्रैव; पृ. क्र. ३१९.
12. तत्रैव; पृ. क्र. ४८४.
13. तत्रैव; पृ. क्र. २९१.
14. दास, श्यामसुंदर(संपा.); 'कबीर ग्रंथावली', नागरीप्रचारिणी सभा-वाराणसी+ नई दिल्ली, संस्करण-२६, सं. २०७०, पृ. क्र. २१.
15. आचार्य विवेकदास (संपा.), 'कबीर साहित्य की प्रासंगिकता', कबीरवाणी प्रकाशन केन्द्र, कबीरचौरा- वाराणसी, द्वि. संस्करण, जून-२००९; पृ. क्र. २०.